# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:23.09.2023** **वारः शनिवार**

---

1. पाकिस्तानला भारतातील घडामोडींवर बोलण्याचा कोणताही अधिकार नाही, भारताची संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत स्पष्टोक्ती
2. जी-वीस शिखर परिषदेच्या यशाचं श्रेय परिषदेसाठी काम करणाऱ्या जी-वीसच्या संघाला असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
3. एक देश एक निवडणूक ही संकल्पना देशात राबवण्याच्या दृष्टीने केंद्रसरकारने स्थापन केलेल्या समितीची आज नवी दिल्लीत पहिली बैठक आणि
4. 19 व्या आशियाई क्रीडा स्पर्धांच आज चीन मधील होंगचाओ इथ औपचारिक उद्घाटन होणार

**भारत आमसभा**

पाकिस्तान संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठाचा दुरुपयोग करतो, असं भारतानं आज संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत स्पष्टपणे म्हटलं आहे. दहशतवादाच्या विरोधात पाकिस्ताननं कारवाई करावी अशी मागणीही भारतानं केली आहे. पाकिस्तानला भारतातील घडामोडींवर बोलण्याचा कोणताही अधिकार नाही, असं भारतानं म्हटलं आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखशी संबंधित मुद्दे ही भारताची पूर्णपणे अंतर्गत बाब असल्याचं भारतानं स्पष्ट केलं आणि मानवाधिकारांबाबत आपल्या निराशाजनक कामगिरीमुळे पाकिस्तान आंतरराष्ट्रीय समुदायाची दिशाभूल करत असल्याची टीका केली आहे.

**जी-वीस-श्रेय**

जी-वीस शिखर परिषदेच्या यशाचं श्रेय ही परिषद व्यवस्थित पद्धतीनं चालू राहावी यासाठी काम करणाऱ्या जी-वीसच्या संघाला असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत काल भारत मंडपममध्ये जी-वीस परिषदेच्या आयोजनात सहभागी अधिकाऱ्यांबरोबर ते संवाद साधत होते. या अधिकाऱ्यांनी त्यांचे अनुभव शब्दबद्ध करावेत- ज्यामुळे भविष्यातल्या आयोजनासाठी ते दिशादर्शक होईल, अशी सूचना त्यांनी केली.

जी-वीसचं यश म्हणजे जगभरात लिहिली गेलेली संपादकीयं नसून, जगभरात भारताविषयी तयार झालेला विश्वास आहे, असं त्यांनी नमूद केलं. दिल्लीत 2010 मध्ये झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत अनेक गोष्टींमुळे भारताविषयी अनादर निर्माण झाल्याची आठवण त्यांनी करून दिली आणि देशाचं ब्रँडिंग करण्याची संधी गमावण्यात आली, असं सांगितलं.

जागतिक पातळीवरच्या संकटांबाबतच्या मदतींमध्ये भारतानं दिलेल्या योगदानामुळे भारताचा विश्वास वाढत आहे, असं सांगून त्यांनी नेपाळ आणि तुर्कीयेतील भूकंप, फिजीतील चक्रीवादळ, मालदीवमधील पाणी संकट, श्रीलंकेतील आर्थिक पेच आणि येमेनमधील संकट अशी उदाहरणं दिली. अशा विविध पेचांमध्ये भारताकडून दिल्या जाणाऱ्या मदतीमुळे भारत बलवान आहे आणि गरज असलेल्या सर्वांपर्यंत मदतीचा हात पुढे करतो, अशी धारणा तयार होत आहे, असं त्यांनी सांगितलं.

**पंतप्रधान- वाराणसी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उत्तर प्रदेशातील वाराणसी या त्यांच्या लोकसभा मतदारसंघाला आज भेट देणार आहेत. सुमारे दीड हजार कोटी रुपये खर्चून उभारल्या जात असलेल्या विकास प्रकल्पांची ते सुरुवात करणार आहेत आणि विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. ते वाराणसीतील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमची पायाभरणी करणार आहेत. गंजरी इथं साडेचारशे कोटी रुपये खर्चून तीस एकरांवर हे स्टेडियम उभारण्यात येत आहे.

स्वरुपानंद संस्कृत विद्यालयात महिला आरक्षण विधेयकाच्या मंजुरीनिमित्त नारीशक्ती वंदन अभिनंदन कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी होणार आहेत. काशी संसद सांस्कृतिक महोत्सतवाच्या सांगता कार्यक्रमातही ते सहभागी होणार आहेत. ते या कार्यक्रमात 16 अटल निवासी विद्यालयांचं उद्घाटन करणार आहेत. कोरोना साथीत अनाथ झालेल्या बांधकाम मजुरांच्या आणि कामगारांच्या मुलांसाठी उत्तर प्रदेशमध्ये 16 ठिकाणी सुमारे 1115 कोटी रुपये खर्चून या विद्यालयांची उभारणी करण्यात आली आहे. दरम्यान, पंतप्रधान आज नवी दिल्लीत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय वकील परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. न्याय यंत्रणेतील वाढती आव्हानं अशी यंदाच्या परिषदेची संकल्पना आहे.

**बैठक**

एक देश एक निवडणूक ही संकल्पना देशात राबवण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी केंद्रसरकारने स्थापन केलेल्या समितीची आज नवी दिल्लीत पहिली बैठक होत आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली 8 जणांची समिती सरकारने 2 सप्टेंबर रोजी स्थापन केली आहे. देशात लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकत्र घेण्याच्या दृष्टीने शिफारसी करण्याची जबाबदारी या समितीवर देण्यात आली आहे . यासंदर्भात राज्यघटनेतील तरतुदी आणि विद्यमान कायदे यांचा अभ्यास ही समिती करणार आहे, तसच निवडणुकी संदर्भात सर्व राज्य, प्रशासन आणि निवडणुकी संबंधित यंत्रणा यांच्या प्रतिनिधींशी हि चर्चा करणार आहे.

**संयुक्त राष्ट्रे-महिला**

संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क आयोगाचे उच्चायुक्त व्होलकर तुर्क यांनी भारतात महिला आरक्षण विधेयक संमत झाल्याचं स्वागत केलं आहे. या विधेयकांत, भारतातील संसदेत आणि राज्य विधान सभांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागांच्या आरक्षणाची तरतूद आहे. या ऐतिहासिक विधेयकामुळे महिलांना संसदेत घटनात्मक प्रतिनिधित्व मिळेल. संयुक्त आपापल्या देशातील राजकीय घडामोडींमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्यावर भर देण्याचं आवाहन तुर्क यांनी जगभरातील नेत्यांना  केलं आहे, असं संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार आयुक्तांच्या प्रवक्त्या रविना शामदासांनी यांनी सांगितलं  आहे.

**<u>मालदीव निवडणूक</u>**

मालदीवमधील अध्यक्ष निवडणुकीची दुसरी फेरी 30 सप्टेंबरला होत असताना दिशाभूल करणाऱ्या बातम्यांबाबत चिंता वाढली आहे. मालदीवमध्ये राहणारे भारतीय उच्चायुक्तालयातले अधिकारी आणि राजनैतिक अधिकारी यांच्याबाबत दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसारित होत असून, भारतीय उच्चायुक्तालयानं निवेदन प्रसिद्ध करून या बातम्यांचं खंडन केलं आहे. या बातम्या भारत आणि मालदीव यांच्यातल्या संबंधांना बाधा आणण्यासाठी दिल्या जात असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणीही भारतीय उच्चायुक्तालयानं मालदीवकडे केली आहे.

**<u>महोत्सव</u>**

आंतरराष्ट्रीय भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या वतीने 28 आणि 29 सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत इंडो-लॅटिन अमेरिका सांस्कृतिक महोत्सवाच्या चौथ्या पर्वाच आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवात कोलंबिया, इक्वाडोर आणि चिली  या देशातील कलाकार सहभागी होणार आहेत. लॅटिन अमेरिकेच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेच दर्शन घडवण हा या मोहत्सावाच्या आयोजना मागचा उद्देश आहे, तसच या महोत्सवामुळे भारत लॅटिन अमेरिका दरम्यान शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहकार्य वाढवण्याबाबत एकत्रित विचार मंथन उद्घाटन

**<u>बांगलादेश निर्बंध</u>**

बांगलादेशमधील आगामी निवडणूक प्रक्रियेला कमकुवत करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांवर व्हिसा निर्बंध लादण्यासाठी पाऊलं उचलत असल्याचं अमेरिकेनं काल जाहीर केलं. अशा व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय अमेरिकेत प्रवेशासाठी अपात्र असतील, असं अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी एका निवेदनात म्हटलं आहे. बांगलादेशातील सत्तारुढ आघाडीतील काही सदस्य, काही विरोधी कार्यकर्ते आणि लष्कराशी काही संबंधितांवर व्हिसा निर्बंध लादल्याचं मिलर यांनी सांगितलं. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी अमेरिकेच्या या कृतीचा तीव्र निषेध केला आहे. बांगलादेशमध्ये या वर्षी डिसेंबरच्या अखेरीस किंवा पुढच्या वर्षी जानेवारीत निवडणुका होणार आहेत.

**<u>रेल्वे-भरपाई</u>**

रेल्वे अपघातांमध्ये आणि दुर्घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना आणि जखमी व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या भरपाईच्या रकमेत सरकारनं वाढ केली आहे. मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपये, तर गंभीर जखमी झालेल्यांना अडीच लाख रुपये दिले जातील, असं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे. इतर जखमींसाठी पन्नास हजार रुपये भरपाई दिली जाणार आहे, मात्र फक्त रेल्वे त्यासाठी जबाबदार असल्यासच ती दिली जाणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत-ऑस्ट्रेलिया दरम्यान पन्नास षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील काल मोहाली इथल्या पहिल्या सामन्यात भारतानं पाहुण्यांवर 5 गडी राखून विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाच्या 276 धावांचा पाठलाग करताना भारतानं 8 चेंडू शिल्लक असताना 5

गडी बाद 281 धावा करून विजयावर शिक्कामोर्तब केलं. शुभमन गिलच्या 74 आणि रुतुराज गायकवाडच्या 71 धावांनी भारताला बळ दिलं. चार भारतीय फलंदाजांनी अर्धशतकं केली. के. एल. राहुलनं 58, तर शिवकुमार यादवनं 50 धावा केल्या. ऑस्ट्रेलियाचे पाच गडी बाद करणारा मोहम्मद शामी सामनावीर ठरला. भारत या मालिकेत 1-0 असा पुढं आहे.

**<u>उद्घाटन</u>**

चीन मधील होंगचाओ इथ आज  संध्याकाळी 19 व्या आशियाई क्रीडा स्पर्धांच औपचारिक उद्घाटन होणार आहे. होंगचाओ इथल्या बिग लोटस नावाने प्रसिद्ध ऑलिम्पिक क्रीडा संकुलात उद्घाटनाचा खास सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये भारतीय खेळाडूंचा संघ सहभागी होणार आहे. भारतीय संघात 42 क्रीडा प्रकारात भाग घेणारे एकंदर 655 खेळाडू आहेत. उद्घाटन सोहळ्यात भारतीय खेळाडूंच्या चमुच नेतृत्व, भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि भारतीय ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती महिला मुष्टीयोद्धा लोवलीना बोर्गोहेन हे करणार आहेत.

**<u>आशियाई स्पर्धा</u>**

दरम्यान, चीनमधील होंगचाओ इथ सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये काल भारतीय खेळाडूंनी व्हॉलीबॉल आणि टेबल टेनिस या क्रीडा प्रकारात शानदार कामगिरी केली. जागतिक स्तरावर 73 व्या क्रमांकावर असणाऱ्या भारताच्या पुरुष व्हॉलीबॉल संघाने, 43 व्या क्रमांकचं मानांकन असणाऱ्या चीनी ताईपे संघाला 3-0 ने हरवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आता उद्या भारतीय संघाचा सामना ऑलिम्पिक विजेता जपानच्या व्हॉलीबॉल संघाशी होणार आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार